


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक-मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com




वर्ष १२ वे अंक ४७ वा | सोमवार,दि.२८ एप्रिल २०२५ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# सरकार खोटे बोलतेय,पाकचे पाणी बंद नाही!



## प्रकाश आंबेडकर यांनी सरकारला उघडे पाडले

## सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित


## आर्मी चीफने केलेलं भाषण महत्त्वाचे

## प्रकाश आंबेडकर करणार आंदोलन

शिर्डी/क्रांतिवीर प्रतिनिधी

भारताने पाकिस्तानचे पाणी बंद केलेले नाही, सरकार खोटं बोलतंय, दिशाभूल करतय, २४ एप्रिल रोजी केंद्रीय सचिवांनी पाकिस्तानला लिहिलेल्या पत्राचा दाखला देत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर प्रतंप्रधान नरेंद्र मोदींसोबत गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिका-यांची बैठक झाली. त्यानंतर, भारताने पाकिस्तानची कोंडी करणारे ५ महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये, पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. पहलगाम हल्ल्यानंतर



केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, अटारी वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. यासोबतच, सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, हा करार रद्द केल्याचे खोटे सांगितले जातय, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

पाकिस्तानला पाणी बंद केल्यासंदर्भाने दिलेले पत्रच त्यांनी दाखवले. या पत्रामध्ये कुठेही पाणी बंद केल्याचा उल्लेख नाही. धरणातले पाणी आम्ही सोडणार नाही, असा कुठेही उल्लेख नाही. याचाच अर्थ इंडस करार भारत सरकारने रद्द केलेला नाही असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. माझ्या भाषेत

### २ मे रोजी निदर्शन करणार!

पहलगाम हल्ल्यापूर्वी पाकिस्तान आर्मी चीफने केलेलं भाषण महत्त्वाचे आहे. त्यामध्ये त्याने टू नेशन थेअरी मांडली. आपल्या इंटेलिजन्स विभागाने ही माहिती देखील सरकारला दिली. मात्र, त्यावेळी सरकार झोपून राहिले. कोणत्याही सूचना दिल्या नाही. आज आपले सैन्य पूर्णपणे तयार आहे. इस पार.. या उस पार. मात्र, पॉलिटिकल लीडरशिपमध्ये ती इच्छा दिसत नाही. त्यामुळे, सरकारमध्ये इच्छाशक्ती व्हावी यासाठी २ मे ला हुतात्मा स्मारकासमोर आपण निदर्शने करणार असल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले.

नरोबा कुंजोबा आणि कायद्याच्या भाषेत स्टेटस्को अस हे पत्र. त्यामुळे जनतेला हे पत्र दाखवले तर सरकार कुठल्या प्रकारची कारवाई करतंय हे समोर येईल. हा गंभीर मुद्दा असून शासनाने याकडे डोळे झाक करू नये. या सगळ्यात फक्त पाकिस्तानी नागरिकांचा भुसार रद्द करून त्यांना बाहेर काढता येत आहे, एवढीच वस्तूस्थिती असल्याचेही आंबेडकर यांनी म्हटले.

### इंडस कराराबात मांडली भूमिका

सिंधू जल कराराबाबत बोलताना आंबेडकर म्हणाले की, कोणताही करारनामा लगेच रद्द करता येत नाही, त्याच्यासाठी किंमत मोजावी लागते. पण मी म्हणतो भाडमध्ये गेले ते रद्द केलाय तर केला रद्द. मात्र, त्याची फॉलोअप ॲक्शन घ्या ना. जे समोर आले त्यात धरणातील गाळ काढणार, पाणी अडवणार याला १० वर्षे लागतील, असेही आंबेडकर यांनी म्हटले.

### पाक नेत्यांच्या वक्तव्यावर भूमिका

पाकिस्तानी नेत्यांना एका गोष्टीची जाणीव आहे की, भारत पाणी थांबू शकत नाही. कारण ते थांबवण्यासाठी व्यवस्था आहे का? पावसाळ्यापूर्वी ती व्यवस्था होऊ शकते का? त्यामुळेच पाकिस्तानचे नेते तुम्हाला उचकावत आहेत.

# धर्माच्या नावावर फूट पाडण्याचे प्रयत्न देशासाठी धोकादायक : शरद पवार

## पहलगाम हल्ल्यानंतर शरद पवारांचे स्पष्ट मत; देशाच्या ऐक्यात कोणतीही तडजोड नको

पुणे/क्रांतिवीर प्रतिनिधी

पहलगाम येथे घडलेली घटना हा मोठा धक्का आहे. देशावर हल्ला होतो, तेव्हा मतभिन्नता नसते, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. काही लोक या परिस्थितीला धार्मिक विचार देण्याचा प्रयत्न करत आहेत, जे देशासाठी अतिशय धोकादायक आहे. देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणार नाही, असेही शरद पवारांनी ठणकावून सांगितले. ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या वाढदिवसानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शरद पवार यांनी उपस्थिती दर्शवली होती. यावेळी बोलताना त्यांनी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर भाष्य करत उपरोक्त विधान केले. यावेळी त्यांनी सर्वपक्षीय बैठकीत नेमके काय झाले याबाबतही माहिती दिली.



स्वातंत्र्य चळवळीच्या काळात समाजवादी लोक एकत्र आले होते आणि महाराष्ट्रात या विचारसरणीची मुळे खोलवर रुजली. पुणे जिल्ह्यात विशेषतः पुरंदर भागात समाजवादी लोकांचा प्रभाव अधिक राहिला आहे. या नेत्यांनी जाहिरातबाजी न करता, कुठल्याही अपेक्षा न ठेवता काम केले आहे, असे शरद पवार म्हणाले.पहलगाम हल्ल्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, देश सध्या अडचणीतून जात आहे. पहलगाम येथे घडलेली घटना हा मोठा धक्का आहे. देशावर हल्ला होतो, तेव्हा मतभिन्नता नसते. आम्हाला विचारण्यात आले की, काय करावे, तेव्हा आम्ही सांगितले की, आज देश एक आहे. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या सर्वपक्षीय बैठकीचा उल्लेख शरद पवारांनी यावेळी केली. त्या बैठकीत काही कमतरता आमच्याकडून झाल्या, हे नेतृत्वाने मान्य केले. पण आज देश संकटात असताना त्या कमतरतांवर चर्चा करण्याची वेळ नाही, असे शरद पवार म्हणाले. काही लोक या परिस्थितीला धार्मिक विचार देण्याचा प्रयत्न करत आहेत, जे देशासाठी अतिशय धोकादायक आहे. देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणार नाही, जेव्हा निवडणूक होईल तेव्हा बघू, असेही शरद पवार यांनी ठणकावून सांगितले.



बीड : मांजरा विकास प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शेकापचे भाई मोहन गुंड यांचा सन्मान करतांना माजी आ. पृथ्वीराज साठे, सुरेश पाटील, दिलीप भिसे, डॉ नरेंद्र काळे ॲड. माधव जाधव, शिवाजी ठोंबरे, गोविंद शिनगारे, सरपंच खोडसे, प्रविण खोडसे, दत्ता मजमुले सर इतर

# लाडक्या बहिण पंधराशे रुपयात खुश !

## २१०० रुपये मिळणार नसल्याचे मंत्री झिरवाळ यांच्याकडून स्पष्ट ! | २१०० रुपये देऊ असे कुणीच म्हटले नाही



जळगाव/क्रांतिवीर प्रतिनिधी

लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? याकडे लक्ष लागले असताना आता राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री यांनी २१०० रुपये देण्याबाबत मोठे विधान केले आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असे कुणीच म्हटले नाही, असे नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. तसेच लाडक्या बहिणी या १५०० रुपयांत खुश असल्याचेही ते म्हणालेत. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले होते. महायुती सत्तेत आल्यानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार, असा प्रश्न विचारला जात होता. तेव्हा अर्थसंकल्पात याबाबत निर्णय घेतात, असे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले होते. १० मार्च रोजी अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. मात्र या योजनेचा सन्मान निधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. त्यानंतर आता नरहरी झिरवाळ २१०० रुपयांबाबत स्पष्ट बोलले आहेत.

### नेमके काय म्हणाले नरहरी झिरवाळ?

लाडक्या बहिणींना २१०० ऐवजी १५०० रुपयेच मिळत आहेत. तेही नियमित मिळत नसल्याने लाडक्या बहिणी नाराज आहेत. असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत मंत्री नरहरी झिरवाळ यांना विचारला. यावर बोलताना लाडक्या बहिणी नाराज आहेत, हे आपण सांगत असता किंवा विरोधक सांगत असतात. पण सर्व बाजूंनी लाडक्या बहिणी खूश आहेत. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे कोणीही जाहीर केलेले नाही, असे मंत्री नरहरी झिरवाळ म्हणालेत.

### लाडक्या बहिणी १५०० रुपयांमध्ये खूश आहेत

विरोधकांनी आधी म्हटले की महायुती लाडक्या बहिणींना १५०० रुपये देणार नाही. कारण त्यांच्याकडे १५०० रुपये देण्याची ऐपत नाही अशी टीका केली होती. त्यानंतर त्यांनी म्हटले की २१०० रुपये देणार आणि मग १५०० रुपये दिले नाहीत तर २१०० कसे देणार? अशी टीका केली. राज्य सरकारने लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले तर आता २१०० रुपये देण्यावर विरोधक जोर देत आहेत. मात्र, असा काही प्रकार नाही. लाडक्या बहिणींना १५०० रुपये देखील परिपूर्ण आहेत. लाडक्या बहिणी १५०० रुपयांमध्ये खूश आहेत, असे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे.

# तर पाकिस्तानसोबत युद्ध

## रामदास आठवलेंची मोठी मागणी

दिल्ली:/क्रांतिवीर प्रतिनिधी

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या दहशतवादी हल्ल्यामध्ये २६ लोकांनी आपला जीव गमावला, तर अनेक जण जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना आता केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी मोठी मागणी केली आहे. पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्या, देत नसतील तर युद्ध करा असं आठवले यांनी म्हटलं आहे.जोपर्यंत पाकव्याप्त काश्मीर आहे, तोपर्यंत दहशतवादी कारवाया सुरूच राहणार आहेत, याकरिता माझी भारत सरकारला व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे, की पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्या व देत नसतील तर पाकिस्तानच्या विरोधात युद्ध पुकारा असे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आठवले यांनी लोणावळ्यात पहेलगाम हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना म्हटले.लोणावळा शहरातील विविध



विकास कामांचा आढावा घेण्यासाठी आठवले लोणावळ्यात आले होते. यावेळी लोणावळा शहरातील पर्यटन विकासाला चालना देणाऱ्या प्रकल्पांना निधी देण्याचे आश्वासन देखील त्यांनी दिले. पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला निंदनीय आहे. त्याच मार्गाने दहशतवादी भारतात येतात. त्यामुळे तो भाग भारतात घेणे आवश्यक आहे. पाकिस्तानने देखील तो भाग सोडावा, नाहीतर आम्ही युद्ध केल्याशिवाय राहणार नाही, आमचं सरकार याविषयी गंभीर आहे, विरोधकांनी आम्हाला साथ द्यायला पाहिजे, असे मत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लोणावळा येथे व्यक्त केले आहे.दरम्यान पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं चारही बाजुनं पाकिस्तानची कोंडी केली आहे. जगातील अनेक मोठ्या देशांचा भारताला पाठिंबा मिळाला आहे. भारताकडून सिंधू नदीच्या पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली आहे, तसेच अटारी बॉर्डर देखील बंद करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, त्यांना देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता पाकिस्तानवर चांगलाच दबाव वाढला आहे. दुसरीकडे पाकिस्तानकडून आता युद्धाच्या पोकळ धमक्या दिल्या जात आहेत. त्यांच्या नेत्यांकडून वादग्रस्त वक्तव्यांची मालिका सुरूच आहे.

# संपादकीय

## मानवतेची हत्या!

काश्मीरमध्ये मंगळवारी गत सहा वर्षांतील सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी यावेळी पर्यटकांना लक्ष्य केले. पहलगाममधील 'छोटे स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणा-या बैसरन भागात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. नाव आणि धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. या गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. त्यात डोंबिवलीचे तिघे, पुण्यातील दोघांचा तर पनवेलमधील एका रहिवाशाचा समावेश आहे. असे सांगण्यात येते की, १० दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. १० दहशतवाद्यांमध्ये ६ जण स्थानिक तर ४ दहशतवादी परदेशी होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा पाकिस्तानच्या सुनियोजित कटाचा भाग आहे असे सांगण्यात येत आहे. या कटात पाकिस्तानने लष्कर–ए–तैयबा आणि जैश–ए–मोहम्मदसारख्या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांचा वापर केला आहे. मंगळवारचा हल्ला अमरनाथ यात्रा सुरू होण्यापूर्वी यात्रेकरू आणि पर्यटकांमध्ये भीती पसरवण्यासाठी करण्यात आला आहे. टीआरएफ संघटना काश्मीरमध्ये मोठे आव्हान बनण्याची शक्यता आहे. या संघटनेला लक्ष्य साधण्यासाठी जंगलात किंवा उंच ठिकाणी लपून बसण्याबद्दलची चांगली माहिती आहे. टीआरएफला फाल्कन स्क्वॉड असेही संबोधतात. हा गट 'हिट अ‍ॅण्ड रन' या धोरणावर काम करतो. त्यांच्याकडे प्रगत शस्त्रास्त्रे आहेत. टीआरएफ हा लष्कर–ए–तैयबाचाच एक छोटा गट आहे.या दहशतवाद्यांनी काही दिवसांपूर्वी पहलगाममध्ये रेकी केली होती आणि संधी मिळताच हा हल्ला केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळ्या झाडल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. बाजूच्या जंगलात ते पळून गेले. टीआरएफ या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. पर्यटकांना धर्म विचारून त्यांनी गोळ्या झाडल्या. हल्ल्याची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तातडीने जम्मू–काश्मीरमध्ये दाखल झाले. हल्लेखोरांना सोडणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह देशभरातील अनेक नेत्यांनी नि:शस्त्र पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे. काश्मीरमध्ये यंदा मोठ्या संख्येने देशी–विदेशी पर्यटक दाखल झाले आहेत. पहलगाम शहरापासून सहा किलोमीटरवरील बैसरनचे गवताळ पठार हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास अनेक पर्यटक खान–पानाचा आनंद घेत असताना दहशतवाद्यांनी त्यांच्या दिशेने बेछूट गोळीबार केला. त्यामुळे पर्यटकांमध्ये गोंधळ उडाला. मोकळे मैदान असल्यामुळे पर्यटकांना कुठे लपण्याची संधीही मिळाली नाही. अंदाधुंद गोळीबार करून अतिरेकी पळून गेले. स्थानिक लोकांनी खेचरावरून जखमींना रुग्णालयात नेल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. बैसरन खो–यात अरुंद वाट असल्याने चालत किंवा खेचरावरून जावे लागते. दहशतवादी टेकडीवरून खाली उतरले आणि त्यांनी ४० पर्यटकांना घेरून त्यांच्यावर गोळीबार केला. याआधी पहलगाममध्ये अमरनाथच्या तळावर २००० मध्ये झालेल्या हल्ल्यात ३० जण ठार तर ६० हून अधिक जखमी झाले होते. बैसरनमध्ये मोठ्या संख्येने अनेक पर्यटक उन्हाळ्याची सुटी घालवण्यासाठी आले आहेत. त्यामुळे स्थानिक वाहतूक सेवा, शिकाराचालक, हाऊसबोट चालक आणि हॉटेलचा व्यवसाय तेजीत आहे. मात्र आता तेथे दहशतवादी हल्ला झाल्याने या सर्वांच्या उत्पन्नावर गदा आली आहे. या हल्ल्यामुळे जम्मू–काश्मीरमध्ये सावधानतेचा इशारा देण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली, सामानाची तपासणीही करण्यात येत होती. सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून जम्मू–श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग १–ए बंद करण्यात आला. त्यामुळे पर्यटकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला. पहलगाममधील हल्ल्याशी पाकिस्तानचा काहीही संबंध नसल्याचे पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी म्हटले आहे.

त्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरले आहे. भारतातील लोकांचाच यात हात आहे. भारतातील अनेक राज्यांत सरकारविरोधात रोष आहे. नागालँडपासून काश्मीर आणि छत्तीसगड, मणिपूरमध्ये लोक सरकारविरोधात आहेत. भारत सरकार लोकांच्या हक्कांवर गदा आणत आहे, त्यांचे शोषण करत आहे. अल्पसंख्याकांचे शोषण होत आहे. त्याविरोधात लोक उभे आहेत. आमचा याच्याशी काही संबंध नाही, आम्ही दहशतवादी कृत्यांचे समर्थन करत नाही असे आसिफ म्हणाले. दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून दिल्लीत परतले. दिल्ली विमानतळावरच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि परराष्ट्र सचिवांसोबत बैठक घेतली. गृहमंत्री अमित शहा जम्मू–काश्मीरमधील परिस्थितीचा आढावा घेत आहेत. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी कारवाई सुरू केली आहे.पहलगाम हल्ल्यानंतर आपल्यावर सर्जिकल स्ट्राईक होतो की काय अशी पाकिस्तानला भीती वाटत आहे. तेथे पाकिस्तानी हवाई दल अलर्ट मोडवर होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून दहशतवादाविरोधात देश एकजूट आहे असे म्हटले आहे. जम्मू–काश्मीरमध्ये परिस्थिती सामान्य असल्याचा फसवा दावा करण्याऐवजी सरकारने या प्रकरणी जबाबदारी घेत ठोस पावले उचलावीत असे म्हटले आहे.

# ट्रोलर्सच्या कर्तुत्वाला सलाम!

तुमच्या जागी आम्ही असतो तर हेच केले असते. पण तुम्ही या परिस्थितीत काश्मिरला आमच्या जागी असतात तर ? काश्मीर पहलगाम इथे दहशतवादी हल्याची घटना घडल्यानंतर ३ दिवसांपासून आपल्या महाराष्ट्रीयन लोकांना इथं मदत करण्यात व्यस्त होतो. त्यावेळी महाराष्ट्रात एक विडिओ वायरल होऊन काही जण खालच्या पातळीवर जाऊन प्रतिक्रिया देत आहेत असे जवळचे काही जण फोन करून सांगत होते पण अपुरी यंत्रणा आणि इथल्या आपल्या लोकांना मदत करणे हे अधिक महत्वाचे असल्याने त्यावर मला तात्काळ बोलता आले नाही. पण इथली खरी परिस्थिती आपण समजून घ्यायला हवी. त्या विडिओ मध्ये मी घेतलेली भूमिका ही कोणत्या परिस्थितीत घेतली हे ही आपण समजून घ्यायला हवं. २२ एप्रिल २०२५ रोजी पेहलगाम येथे हल्ला झाला त्यादिवशीच आम्ही सकाळी ९.३० वाजता श्रीनगर एअरपोर्टला पोहचलो होतो. फ्रेश होऊन आम्ही ११.३० ला बाहेर पडलो टुलिप गार्डन व इतर गार्डन बघत असताना पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्याची माहिती आम्हाला आमच्या वाहन चालकाकडून मिळाली. त्यावेळी त्यात २ जण शाहिद झाले आहेत अशी तात्पुरती प्राथमिक माहिती होती. पण शहर सुरळीत चालले होते. परिस्थिती अजून खराब झाली तर घरच्यांना संपर्क करता यावा यासाठी आम्ही नवीन सिम कार्ड घेतले कारण आपल्या महाराष्ट्रातील सिम कार्ड इथे चालत नाही. सिम कार्ड सुरु झाल्यानंतर हल्ल्याच्या अपडेट्स मिळायला लागल्या. मृतांचा आकडा वाढत चालला होता. देशाचे गृहमंत्री अमित शहा हे काश्मीर मध्ये मीटिंगला येणार असे मथळे बातम्या मध्ये येत होते. खरी परिस्थिती कळावी यासाठी आम्ही श्रीनगर आर्मी मध्ये काम करणाऱ्या एका ओळखीच्या अधिकाऱ्यांना कॉल केला. तेव्हा त्यांनी सांगितले की मृतांना व जखमीना ते आहेत त्याच श्रीनगरच्या कॉन्टोन्मेंट हॉस्पिटलमध्ये मध्ये आणले जात आहे व अमित शहा देखील मिटिंग करिता याच ठिकाणी पोहचत आहेत. देशाचे गृहमंत्री येत आहेत म्हणल्यावर आता आम्हाला हल्याची तीव्रता कळायला लागली होती. त्याचवेळी जखमीमध्ये महाराष्ट्रातील काही पर्यटकांची संख्या आहे असे बातम्यामधून कळाले म्हणून त्यांना आपण मदत करावी असा निर्णय माझे पती श्री. धनंजय आणि आम्ही घेतला. त्याच आर्मी ऑफिसरला फोन करून आम्ही आम्हाला आत मध्ये येण्याची परवानगी मिळू शकते का? अशी विनंती केली. आर्मीच्या कॉन्टोन्मेंट मध्ये जाणे सोपे नसते त्यासाठी मोठी प्रक्रिया असते आणि त्यात एवढी वाईट परिस्थितीत असताना पास निघेल असे वाटत नव्हते. पास निघेपर्यंत १ ते १.३० तास लागणार होता परंतु श्रीनगर हे हल्ल्यापासून ९० किलोमीटर दूर असून देखील परिस्थिती बदलायला लागली होती. अमित शहा येणार असल्याने कुछ बडा होने वाला है – कुछ बडा होने वाला है असा संदेश ड्राइवर एकमेकांना सांगत होते. अचानक आर्मी रस्त्यावर उतरली जिकडे तिकडे जवान आणि त्यांच्या गाड्या फिरायला लागल्या. ज्या पर्यटकांचे फोन बंद होते त्यांना हे अचानक काय होत आहे तेच कळत नव्हतं. आम्ही तखझ रोड वर होतो. गृहमंत्री राजभवनला मीटिंगला जाणार म्हणून रस्ते रिकामे केले जात होते.




अखेर आमचा पास निघाल्यावर आम्ही सुरक्षेची पूर्ण तपासणी करून आर्मीच्या कॉन्टोन्मेंट मध्ये गेलो. तेव्हा त्या परिसरात एक–एक मिनिटाला हेलिकॉप्टर येत होते. त्यात जखमी पर्यटक व मृत्यूमुखी पडलेल्या बांधवांचे पार्थिव आणले जात होते. यंत्रणा अलर्ट केली होती. सर्व अधिकारी कामकाजावर रुजू झाले होते. गृहमंत्री येण्याची पूर्ण तयारी झाली होती. आम्ही आर्मीच्या कॉन्टोन्मेंट मध्ये असल्याने आम्ही सुरक्षित होतो पण बाहेर आमचा उभा असलेला ड्राइवर (मुद्दतसर)घाबरला होता. कारण त्याच्या घरून फोन चालू झाले होते. त्याची लहान बहीण घरात रडायला लागली होती. त्यामुळे तो आम्हाला लवकर बाहेर या असे म्हणत होता. श्रीनगर मधील रस्ते सुनसान होत चालले होते. पर्यटक काश्मीरच्या विविध ठिकाणी अडकेलेलं होते. आम्ही कसे बसे आमचे नातेवाईका इथे आहेत असे सांगून आर्मीच्या ९२ बेस हॉस्पिटल मध्ये गेलो. तिथे कुणी महाराष्ट्रीयन आहे का ? याची माहिती घेतली. तोपर्यंत महाराष्ट्रातून तिथे कुणाला आणण्यात आले नव्हते. रात्री उशीर झाला होता कॉन्टोन्मेंट च्या बाहेर पडून आम्ही त्या ड्राइवर सोबत एकदम सुनसान रस्त्याने हॉटेलला पोहचलो. त्यावेळी जागोजागी आर्मी चे जवान उभे होते. चेकिंग चालू होती हे सगळे पार करत रात्रीच्या ११.३० वाजता आम्ही हॉटेलला पोहचलो. रात्रीतुन आकडा २६–२७ वर गेला अशी बातमी आली. त्यात महाराष्ट्रातील पुण्याचे २ आणि इतर ४ मृत्यूमुखी पडले असे स्पष्ट झाले. आणि या हल्यात एकही दहशतवादी न सापडल्याने अजून काही दहशतवादी फिरत असल्याची देखील बातमी होती. २३ एप्रिलला आमच्या लग्नाला १ महिना पूर्ण झाल्याने हॉटेल चालकाने आमच्यासाठी सकाळपासून सेलेब्रेशनची तयारी करून ठेवली होती हे सगळं सोडून आम्ही लोकांना मदत करायचे ठरवले. हॉटेलच्या खाली येऊन एक विडिओ बनवून महाराष्ट्रातील पर्यटकांना आवश्यक असलेल्या मदतीसाठी आम्हाला संपर्क करण्याचे आवाहन केले आणि बाहेर पडलो. काश्मिरी लोकांनी त्यादिवशी बंदचे आवाहन केले होते. सगळी दुकाने बंद होती. पहलगाम–गुलमर्ग–सोनमर्ग येथे पर्यटक अडकेलेले होते. काही पर्यटकांचे व त्यांच्या नातेवाईकांचे फोन यायला लागले. हल्ला झाला ती जागा उंचावर आहे. तिथे घोड्यावर जावे लागते. तिथून कार पार्किंग खूप लांब आहे. जिवाच्या भीतीने ड्राइवर व घोडेवाले सैरभैर झाले होते. लोकांना बाहेर पडायला वाहन नव्हते. सेवा पूर्वव्रत झाली तरच आणि ड्राइव्हर कामावर रुजू झाले तरच लोकांना हॉटेल, एअरप्पोर्ट अश्या सुरक्षित ठिकाणी पोहोचता येणार होते. सगळे व्यवसायिक व ड्राइवर सेवा सुरु करावी की नाही या संभ्रमात होते. एकमेकांना फोन करून विचारपूस करत होते. त्यांची भाषा आम्हाला कळत नव्हती पण आमच्या ड्राइवर च्या बोलण्यावरून आम्हाला जाणवले की हे सगळे ड्राइवर सेवा बंद करण्याच्या विचारात आहेत. मीं आमच्या (मुद्दतसर) ड्राइवरला बोलले की भैय्या, आप अगर आज सेवा नहीं देंगे तो लोग कैसे सुरक्षित जगह पे पोहचेंगे. काश्मीर तो कोई नहीं आयेगा ऐसे तो. तो म्हणाला 'मॅडम, ये मेरा अकेले का केहना नहीं हैं।हमारा भी कोई मालिक हे उपर और पिळेप भी है उनका सुन्ना पडता है। हम तो बस गाडीपे ड्राइवर है। इधर अमित शहा आये है। सब ड्राइवर बोल रहे है की कुछ बडा होने वाला है । मे क्या करू ? हमे भी घरवाले आज नहीं छोड रहे थे । माझे पती त्यांना म्हणाले की, 'ये सब ड्राइवर लोग हमे कहा मिल सकते? तो म्हणाला 'दल लेक' यह एक जगह है। यहा सारे हॉटेल मे हमारी व्यवस्था रेहती है वही मिलेंगे सब। आम्ही त्याला तिथे घेऊन जायला सांगितले. तिथे जाऊन त्या लोकांना भेटलो. त्यांच्या युनियनच्या लोकांना फोनवर बोललो त्यांच्या गाडी मालकाला बोललो. त्यांना सांगितले की पेहलगाम येथे एवढे लोक आहेत त्यांना गाड्या नाहीत त्यांचे ड्राइवर सोबत संपर्क होत नाही आणि तुम्ही जर आता आम्हांला सहकार्य केले नाही तर खूप चुकीचा संदेश जाईल. पुन्हा कुणीही काश्मीर ला येणार नाही. तुमचं पोट पर्यटकांवर आहे तुम्ही आजचा विचार करू नका उलट तुम्ही आमच्यासाठी मदत करत आहात हा संदेश दया आणि सेवा सुरु करा. काश्मीर मध्ये पर्यटकांना सेवा देणारे सर्व मुस्लिमच आहेत. त्या सर्व मुस्लिम चालकांना एकत्र करून त्यांच्यात पर्यटकांप्रति अस्मिता निर्माण करून आम्ही त्यांना घेऊन रस्त्यावर उतरलो. 'भारत माता की जय, आणि 'टुरिस्ट हमारी जान है ' अश्या घोषणा दिल्या. आतंकवादयानी धर्म विचारून लोकांना मारले हे सत्य त्यावेळी बाहेर येण्यापूर्वी ही प्रक्रिया घडली. परंतु त्यावेळी पाकिस्तानी धर्मवाद्याबद्दलचा राग तिथे सेवा देणाऱ्या काश्मिरी मुस्लिम नागरिकांवर काढत बसलो असता तर आपल्या पदरात काय पडले असते? उलट लोक अडकून राहिले असते. आणि म्हणून त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी मी तिथे स्थानिक लोकांसोबत बोलताना बोलले की, 'भाई हिंदू–मुस्लिम असे काही नाही झालेले नहीं ये गलत है । हम सब एक है । हमे एक दुसरे की मदत करनी चाहिये ।' ही मी घेतलेली भूमिका स्थानिक तिथली परिस्थिती बदलावी आणि महाराष्ट्रातील लोकांना सेवा भेटावी यासाठी होती. पण तिथून कुणी तरी एक विडिओ काढला आणि तो देशभरात वायरल झाला. हे असं वायरल होईल अशी कल्पना देखील आम्ही त्या परिस्थितीत केलेली नव्हती कारण आम्हाला ज्यांचे फोन येत होते त्यांना सुरक्षित ठिकाणी येण्यासाठी वाहनाची व्यवस्था व्हावी हिच आमची भावना होती. पण इथल्या परिस्थितीचे आणि दहशतवाद्याच्या धर्मवादाचे कनेक्शन जोडत महाराष्ट्रातील काही लोकांनी वेगळा अर्थ काढला. साहजिक आहे मी आणि माझे पती जरी त्यावेळी तुमच्या जागी महाराष्ट्रात सुरक्षित एका खोलीत बसलेलो असतो आणि आम्हांला इथली परिस्थिती माहित नसली असती आणि असा कुणाचा विडिओ वायरलं झाला असता तर आम्हालाही हे चुकीचेच वाटले असते. पण तुम्ही जर आमच्या जागी काश्मीर ला असता तर तुमची भूमिका काय असली असती ?

१००–१५० ड्राइवर व शिकारा राईड च्या चालकांना विविध ठिकाणी अडकलेल्या आपल्या लोकांसोबत संपर्क करून देत असताना आम्हाला कळले की लाल चौक येथे काश्मीर मधील सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, आमदार, खासदार रस्त्यावर उतरले आहे. ही सेवा पूर्वव्रत व्हावी यासाठी त्यांनी काश्मिरी नागरिकांना आवाहन करावे यासाठी त्यांना आपल्या महाराष्ट्रीयन लोकांची खरी हकीकत सांगायला आम्ही तिथं पोहचलो. तिथं आम्ही इंडियन कॉन्फरेन्सचे जेष्ठ नेते आणि जम्मू काश्मीरचे सध्याचे मुख्यमंत्री उम्मर उब्दुल्ला यांचे सध्याचे सल्लागार निसार असलाम वाणी, मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव झहीर व झमीर, तसेच आमदार तन्वीर सादिक यांची भेट घेतली. त्यांच्या सोबत पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात घोषणा दिल्या व त्यांना मदतीचा हाथ मागितला. त्यांनी महाराष्ट्रातील लोकांची माफी मागत काश्मीर प्रशासन व काश्मिरी नागरिक सेवा न थांबवता तुमच्यासोबत उभा राहतील असे आश्वासन दिले. त्यानंतर चहा टपरी वाले, ड्राइवर, शिकारा राईड वाले, हाऊस बोट वाले व इतर व्यवसायिक यांच्या मध्ये सकारात्मक संदेश गेला आणि सेवा पूर्वव्रत व्हायला मदत झाली. हे काश्मीर मधील नेते फक्त आश्वासानावर थांबले नाहीत तर त्यांच्या मुख्य नेत्यासोबत आमचे नंबर देवाणघेवाण करून ते आजही आमच्या संपर्कात आहेत व आपल्याला मदत करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी देखील सहकार्याच्या भावनेतून काल या नेत्यांची भेट घेतलीचकी.

यानंतर आम्हाला कळाले की महाराष्ट्रातील जखमी पर्यटकांना आर्मीच्या हॉस्पिटलला आणले आहे. आम्ही लगेच तिथे पोहचलो. तिथं पनवेल येथील श्री. सुबोध पाटील यांना मानेला गोळी चाटून गेल्याने त्यांची परिस्थिती भयानक होती. त्यांचे ऑपेरेशन चालू होते. त्यांच्या पत्नी सौ. माणिक पाटील या एकट्याच तिथे होत्या. महाराष्ट्रातून कुणी तरी मदतीला आल्याने त्यांना धीर आला. त्यांच्या नातेवाईकांना माझ्या पतींनी संपर्क करून 'आम्ही आहोत तुम्ही चिंता करू नका' असे सांगितले. त्यांना देखील आधार वाटला. तिथल्या महाराष्ट्रीयन अधिकाऱ्यांसोबत त्या रुग्णाची व त्यांच्या पत्नीची ओळख करून दिली. हल्ला झाल्यापासून माझे पती श्री. धनंजय जाधव हे राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या सोबत संपर्कात होते. रुग्ण शुद्धीवर आल्यावर सायंकाळी मुख्यमंत्र्याचे आणि त्यांचे बोलणे करून दिले. रुग्णाचे नातेवाईक हॉस्पिटलला पोहचल्यावर त्या नातेवाईकांसोबत देखील मुख्यमंत्री विडिओ कॉल वर बोलले. याच रुग्णाचे या हल्यादरम्यान महत्वाचे साहित्य व कागदपत्रे गहाळ झाली होती ती मिळवण्यासाठी आर्मी आधिकारी यांचे सोबत आम्ही समन्वय साधून दिला.आमच्या लग्नाला फक्त १ महिना झाला आहे आणि आधीच मागची १० वर्ष लोकांसाठी शेतकऱ्यांसाठी संघर्ष करण्यात आणि पोलिसांच्या लाठ्या काठ्या खाण्यात गेल्याने हे १० दिवस मोबाईल बाजूला ठेवून एकमेकांना वेळा दयायचा, आयुष्याचा आनंद घ्यायचा आणि लोकांच्या सेवेत पुन्हा रुजू व्हायचं हे आम्ही येताना ठरवले होते परंतु हे आमच्या आयुष्यातील गुलाबी दिवस सोडून आम्ही मागील ३ दिवस दिवस–रात्र प्रत्येक कॉल उचलून हेच करत आहोत. पुढेही करणार आहोत.परंतु वाईट याच वाटते की ज्या महाराष्ट्रीयन लोकांसाठी आम्ही राज्याच्या बाहेर असताना जीवाचा विचार न करता उभा राहिलो. त्याच महाराष्ट्रातील लोकांनी इथली परिस्थिती समजून न घेता आम्ही आतंकवाद्याना क्लीन चीट देत आहोत म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. पाहिजे असते तर या परिस्थितीत आम्ही आमच्या हॉटेलच्या रूमचे दरवाजे बंद करून निवांत बसलो असतो किंवा मग राजकीय नेत्यांना फोन करून आमच्या दोघांचे परत येण्याचे तिकीट काढून पुण्यात सुरक्षित येऊ शकलो असतो. पण आम्ही दोघेही मुळात चळवळीतून आल्याने असा विचार आमच्या दोघांच्या मनाला देखील शिवला नाही. एखाद्या आमदार खासदाराच्या पोटाला जन्माला आलो असतो तर नक्कीच रूम मध्ये दडून बसलो असतो. काही लोक म्हणतात प्रसिद्धी साठी केले. इकडे काय आम्हाला काश्मीर मध्ये येऊन निवडणुकीला उभा राहायचे होते का? सकाळी हॉटेल मधून बाहेर पडलो तेव्हा आपण वायरल होऊ हे माहित होते का? एक महिना आधी लग्न झालेले असताना हनिमून सोडून असल्या प्रसिद्धी साठी कोण जीव धोक्यात घालेल का? पण आता जेव्हा हे ट्रॉलिंग बघते आहे तेव्हा कधी आयुष्यात असे शब्द ऐकले नसतील अश्या खालच्या पातळीवर येऊन जी भाषा आपण वापरली आहे ना त्यावरून असे वाटते की आपल्या घरात आई बहीण कुणीच नाही. इथे या परिस्थितीत प्रत्येकाला आपला जीव वाचवायचा असतो तिथे कुणाला जात धर्म दिसत नाही. पण महाराष्ट्रात सुरक्षित बसलेल्या आणि घरातून फेसबुक इन्स्टा चालवणाऱ्यांना आणि त्यातून आपला राजकीय स्वार्थ शोधणाऱ्यांच्या डोक्यात जात धर्म येणे साहजिक आहे.अश्या परिस्थितीत पाकिस्तानी दहशतवाद्यांनी धर्म विचारून लोकांना मारले हे सत्य असताना या हल्यात इतर पर्यटकांना वाचवणारे शाहिद सय्यद आदिल हुसेन व हातात शस्त्र नसताना दहशतवाद्याना भिडणारे , ११ हिंदू पर्यटकांना वाचवणारे नजाकत अली, लहान लेकरांना खांद्यावर टाकून सुरक्षित ठिकाणी पोहचवणारे सजात अहमद भट नावाचा मुस्लिम तरुण यांनाही आपण त्यांच्या धर्मामुळे भारत विरोधी समजणार आहोत का? पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकाना धर्म विचारून मारले हे सत्यच आहे. कारण त्यांचा हेतूच काश्मीर अशांत करून देशात धार्मिक तणाव निर्माण करणे हाच होता. शेवटी एवढंच वाटतं की भारतीयांनी आपल्या आपल्यात भांडण करण्यापेक्षा ज्यांनी आपल्यावर हा भ्याड हल्ला केला, ज्यांना हिंदू – मुस्लिम यांच्यामध्ये दरी निर्माण करून काश्मीर भारतातून वेगळे करायचे आहे त्या धर्मवादी पाकिस्तान्यांना मुहतोड जबाब देण्यासाठी आपण भारत सरकारला सहकार्य केले पाहिजे आणि भारत हा एकसंघ आणि अखंड राहावा यासाठी मन मोठे करायला हवे.

–पुजा धनंजय जाधव–मोरे

# जून मध्ये जनतेचे स्वातंत्र्य संपुष्टात येणार?

**महेंद्र कुंभारे,**
संपादक तथा कामगार नेते, भिवंडी.
शनिवार दि. १९ एप्रिल २०२५.
मो.नं. ८८८८१८२३२४/

भारतातील प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. तो आपले मत निर्भिडपणे मांडू शकतो. संविधानाने हा अधिकार प्रत्येक नागरीकाला दिला आहे. परंतु, संविधानाला छेद देत महाराष्ट्रातील महायुती सरकार येत्या जून मध्ये पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम २०२४ हा कायदा पास करणार आहे. सदरचा कायदा इतका भयानक आहे की, नागरीकांचे स्वातंत्र्यच धोक्यात येणार आहे. हा कायदा प्रामुख्याने शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी आणत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. मात्र, कायदेपंडित आणि जाणकार, अभ्यासू व्यक्तिंच्या मते हा कायदा विरोधकांवर सूड उगविण्यासाठी आणि जनतेचे स्वातंत्र्य संपुष्टात आणण्यासाठीच आणत असल्याचे सांगत आहेत.

या कायद्यातील विविध कलमांचा अभ्यास केला असता असे समजते की, कोणीही सरकारच्या विरोधात बोलल्यास, लिहिल्यास त्यांना विना चौकशी जेलमध्ये टाकण्याचा अधिकार पोलिसांना देण्यात आला आहे. म्हणजे जून महिन्यानंतर हा कायदा अस्तित्वात आल्यास लोकशाहीचा चौथा स्तंभ जो थोडाफार जिवंत आहे तो आपोआप गळून पडेल. कोणीही पत्रकार, लेखक सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टिका करु शकणार नाही. अन्यथा त्याला जेलची हवा खावी लागणार. कोणत्याही संस्था, संघटना, व्यक्ती यांना कोणताही जमाव जमविण्याचा आणि धरणे, मोर्चे, आंदोलन आणि उपोषण करण्याचा अधिकार राहणार नाही. सर्व आंदोलने चिरडून टाकले जातील. म्हणजेच शासनाच्या अन्यायाविरुद्ध कोणालाच आवाज उठविता येणार नाही. त्यामुळे शेतकरी शेतमालाला हमीभाव मागू शकणार नाही, कामगार न्याय हक्कापासून वंचित राहतील, बेरोजगार रोजगार मागू शकणार नाही आणि अन्यायग्रस्त व्यक्तीला गुपचूप अन्याय सहन करावे लागणार आहे.

एखादी व्यक्ती बँकेत पैसे भरण्यासाठी अथवा काढून परत येत असेल तर त्याला विना चौकशी अटक करण्याचे अमर्याद अधिकार पोलिसांना देण्यात आले आहेत. नक्षलवाद्यांना पैसे द्यायला चालला असेल या संशयाने त्याला अटक केली जाऊ शकते. म्हणजे कोणाकडेही लाख दोन लाख रुपये आढळले तरी त्याला विना चौकशी अटक होऊ शकते. किती भयंकर ही बाब होय. या कायद्याने नक्षलवाद्यांचा बिमोड करण्याएवजी नागरीकांना घटनेने दिलेले अधिकारच संपुष्टात आणले जाणार आहे. हा महाभयंकर कायदा असून टाडा सारख्या कायद्यांनाही मागे टाकणार आहे. या कायद्यामध्ये वापरण्यात आलेली भाषा व शब्द नक्षलवादाकडे बोट दाखवित असले तरी त्याचा वापर सामान्य नागरीकांपासून विरोधीपक्ष, शेतकरी, कामगार, बेरोजगार अशा समाजातील प्रत्येक घटकांतील व्यक्तींवर वापरला जाणार आहे. त्यामुळे हा महाभयानक कायदा येत्या पावसाळी अधिवेशनात मंजूर झाला तर, महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य संपुष्टात येणार आहे. महायुती सरकार या कायद्याबाबत कितीही सफाई देत असले तरी, त्यावर विश्वास ठेऊन तो पास करुन देणे आयुष्यातील सर्वात मोठी घोडचूक ठरु शकते. म्हणून झोपी गेलेल्या जनतेने आणि सरकारचे समर्थन करणाऱ्या त्यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या ताकदीने या कायद्याला विरोध दर्शविला पाहिजे. या कायद्याचा वापर तुमच्यावरही होऊ शकतो. कारण, संतोष देशमुख भाजपचा पदाधिकारी असतानाही सरकार त्याला न्याय देऊ शकला नाही. त्यामुळे आज जे सुपात आहेत ते उद्या जात्यात यायला वेळ लागणार नाही. म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम २०२४ या कायद्याला प्रखर विरोध होणे काळाची गरज आहे.

# महीलांना सन्मान जनक आरोग्य सेवा द्या

## मनिषा तोकले : प्रशासनाकडे केली मागणी



बीड:शासनाने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या उपचाराची विशेष मोहीम राबवली आहे. आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या गर्भाशय मुखाच्या कर्करोग तपासणीच्या उपक्रमाचे आम्ही महिला ऊसतोड कामगार संघटनेच्या वतीने स्वागत करतो. कारण महीला उसतोड कामगार संघटनेच्या अनेक वर्षाच्या कामाचे हे यश आहे. असे महीला उसतोड कामगर संघटनेच्या मनिषा तोकले म्हणाल्या.

दीनाक़ १डीसेंबर २०२४ ते ३१मार्च २०२५ या कालावधीत शासनाच्या वतीने गर्भाशय मुखाच्या कर्क रोग निदान मोहीम बीड जिल्ह्यात राबवण्यात आली होती. या मोहीमेत बीड जिल्ह्यात १६ हजार ६४९ महीलाऩा गर्भाशय मुखाचा कर्करोग असल्याचे प्राथमिक तपासणी नंतर हा सश़यीत आकडा बाहेर आला आला आहे. त्यांच्या पुढच्या तपासणी व निदानानंतर कर्क रोगा संबंधी खरे खरा आकडा बाहेर येईल. कर्करोगाचे वेळीच निदान होऊन त्यावर उपाय करण्याच्या दृष्टीने शासनाने हे महत्वाचे पाऊल उचलले आहे. ह्यामुळे अनेक महिलांचा जीव वाचवता येईल. ही मोहीम म्हणजे महिला ऊसतोड कामगार संघटनेच्या अनेक वर्षाच्या कामाचा परिणाम आहे त्यामुळे उसतोड कामगार महीलाऩी या मोहीमेत सहभागी होवून तपासणी करून घ्यावी असे अवाहन मनिषा तोकले याऩी महीलाऩा केले आहे.या पुढे महीला उसतोड कामगार सघ़टनेची अशी मागणी राहील की ह्या उपक्रमाचा भाग म्हणून या महीलांना सरकारतर्फे उत्तम दर्जाचे उपचार मिळाले पाहीजेत, उच्च दर्जाच्या तपासण्या झाल्या पाहीजेत. उच्च दर्जाच्या उपचाराच्या सुविधा मिळाल्या पाहीजेत तसेच या महीलांचे समुपदेशन केले पाहीजे. या सर्व आरोग्य विषयी सुविधा शासनातर्फे मोफत पुरवाव्यात तसेच या महीला पूर्ण दुरुस्त होई पर्यंत त्याचा पाठपुरावा केला जावा.

# हजारो हेक्टरवरील पिके धोक्यात

## चर्चा:पाटबंधारे विभाग अधिकाऱ्यांना गांभीर्य नाही



### पाटबंधारे विभागाच्या दारात बसणार: पौळ

पाट बंधारे विभागाचे अधिकारी जाणूनबुजून शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी सोडत नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्याने ऊसउत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. पाण्या अभावी ऊस / पिके करपत आहेत, पाट बंधारे अधिकाऱ्यांना फोन करुन विचारले असता उडवा उडवीची उत्तरे देत आहेत. थर्मलला पाणी दिल्या जात आहे असे म्हणत आहेत.थर्मल च्या पाण्याला आमचा काही विरोध नाही परंतु महिणा उलटला आहे , सिंचनासाठी चा–यांना अद्याप पाणी सोडले नाही . शेतकरी चिंतेत सापडला आहे. दोन दिवसांत पाणी नाही मिळाले तर पिकांचा धुरुळा होऊन जाईल. या मुळे शेतकरी वर्ग खुप संतापला आहे . दोन दिवसात पाणी सोडले नाही तर शेतकऱ्यांना घेऊन पाट बंधारे विभागाच्या दारात बसुन अंदोलन केले जाईल असा ईशारा ऊस उत्पादक शेतकरी तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण पौळ यांनी दिला आहे .

परळी/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील हजारो हेक्टरवरील पिके पाण्या अभावी धोक्यात सापडली आहेत. ऊस व हंगामी पिके करपू लागली आहेत. जायकवाडी मधून उजव्या कालव्यात पाणी सोडले आहे, हे पाणी थर्मलला सुरु आहे परंतु अद्याप उजव्या कालव्यातून सिंचनासाठी चाऱ्यांना पाणी सोडले नाही ,थर्मलला मात्र आठ दिवसांपासून पाणी पुरवठा केला जातो आहे . पाण्या अभावी पिके करपत असतांना, शेतकरी संकटात सापडलेला असतांनाची परिस्थिती आहे मात्र याचे संबंधित पाट बंधारे विभागाला कसलेही गांभीर्य असल्याचे दिसत नाही .काळ्या मातीच्या जमिनीवरील पिके सुकू लागली तर बरडी,मुरमाड, हलक्या जमिनीवरील पिके तर अक्षरश वाळू लागली आहेत, हि परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. अजून चार पाच दिवस तरी सिंचनासाठी पाणी सोडल्या जाणार नाही असे पाटबंधारे विभागाचे अधिकारी सांगत आहेत. महिणा महिणा पाणी पिकांना मिळत नसेल तर अशा उष्ण कडक उन्हाळ्यात पिके तग धरु शकणार नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्यास सहाजिकच उत्पन्नावर परिणाम होणारा आहे . जायकवाडी च्या पाण्याच्या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी खुप मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केलेली आहे. परंतु वेळेत पाणी सोडले जात नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

# शैक्षणिक धोरणाविरोधात लढा

## अड.अमोल डोंगरे:सुरुमगाव येथे जयभिम महोत्सव



माजलगाव/प्रतिनिधी

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्त माजलगाव तालुक्यातील शेवटचे असणारे गाव सुरूम गाव येथे दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सकाळी ९:३० वाजता निळ्या ध्वजा चे ध्वजारोहण सुरूमगावचे विद्यमान सरपंच श्री.शिवकुमार माने यांच्या हस्ते संपन्न झाले. तर कार्यक्रमाचे उद्घघाटन माजी सरपंच कल्याण गुळभिले यांनी केले.बहुजन समाज पार्टी, बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे हे यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत असतांना म्हणाले की; इथल्या मनुवादी व्यवस्थेने भारतीयांचा संविधानीक असणारा मुलभूत शैक्षणिक अधिकारामध्ये बदल घडवून भारतीयांनी यापुढे शिक्षण घेवू नये यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात येत आहे.

याव्दारे पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करुन पुर्व प्रार्थमिक ते बारावी पर्यंतचे शिक्षण एकाच छताखाली म्हणजे स्कुल कॉम्प्लेक्स दहा–बारा गावात पंधरा ते तीस किलोमीटर अंतरावर तयार झाले तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही आपोआप मुलींचे शिक्षण बंद होईल.त्यामुळे पुन्हा एकदा देशाला अस्थिर करून भारतीयांना गुलाम करण्याचे सुरू असलेले षडयंत्र या देशातील नागरिकांनी हाणुन पाडण्यासाठीचा लढा माजलगाव तालुक्यापासून उभा करणार असे बहुजन समाज पार्टी चे बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे यांनी म्हटले यावेळी या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत गुळभिले, उपसरपंच नितेश खोपे, उमाकांत खोपे,विखे पाटील, पांडू राऊत उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू शिनगारे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समिती अध्यक्ष सचिन वाव्हळ, उपाध्यक्ष अंकुश वाव्हळ, सचिव उत्तम वाव्हळ,सह सचिव रवि वाव्हळ सल्लागार लक्ष्मण वाव्हळ,सह सल्लागार संतोष वाव्हळ, कोषाध्यक्ष रामप्रभु वाव्हळ,संघटक शिवाजी वाव्हळ,सह संघटक रमेश वाव्हळ, संरक्षण प्रमुख अनिल वाव्हळ यांनी प्रयत्न केले.या कार्यक्रमास गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निलज्योती संस्थेकडून यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



बीड/प्रतिनिधी

निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे संस्थेचे सचिव व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत व्हिक्ट्री इंग्लिश स्कूल , डॉ. भिमराव पिंगळे विद्यालय , छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय , गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड या शाळांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डोंगरदिवे सर , मुख्याध्यापक मुंडे सर , प्रिन्सिपल गीते मॅडम , तांदळे सर , गदळे सर व डॉ. नंदकुमार उघाडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या सामान्यज्ञान स्पर्धेसाठी वर्गनिहाय गट पाडण्यात आले होते. प्रत्येक गटासाठी १०० प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली. या प्रश्नपत्रिकांमध्ये इतिहास , भूगोल , भारतीय राज्यपद्धती , समाज सुधारक , विज्ञान मराठी व्याकरण , इंग्रजी व्याकरण , गणित , बुद्धिमापन चाचणी व चालू घडामोडी या घटक विषयांसह शालेय अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या स्पर्धेत डॉ भीमराव पिंगळे विद्यालय बीड गट–अ मधून प्रथम क्रमांक रितेश जाधव , द्वितीय क्रमांक यश जाधव व तृतीय क्रमांक साहिल वडमारे आणि अस्मिता थोरात यांनी मिळवला. गट ब मधून प्रथम क्रमांक सायली बर्डे , द्वितीय क्रमांक यश इंगोले व तृतीय क्रमांक दिशा मेंगडे यांनी मिळवला. गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीडमधून प्रथम क्रमांक अनुश गदळे , द्वितीय क्रमांक सृष्टी आंधळे व तृतीय क्रमांक अनुजा पवार यांनी मिळवला. छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय बीड मधून प्रथम क्रमांक आमिनेस गिरे , द्वितीय क्रमांक शिवतेज कागदे व तृतीय क्रमांक सृष्टी जाधव यांनी मिळवला. व्हिक्ट्री इंग्लिश स्कूल मधून गट अ प्रथम क्रमांक उत्कर्ष वाडचकर , द्वितीय क्रमांक अधिरा चव्हाण व तृतीय क्रमांक हुझेफा शेख यांनी मिळवला. गट ब मधून प्रथम क्रमांक सम्राट कसबे , द्वितीय क्रमांक जगदीश ढोले व तृतीय क्रमांक आक्सा शेख यांनी मिळाला. गट क मधून प्रथम क्रमांक झईद बेग , द्वितीय क्रमांक आरफान शेख तृतीय क्रमांक कार्तिक शिंदे या विद्यार्थ्याने मिळवला. सामान्य ज्ञान स्पर्धेत यश मिळवणाऱ्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# बीडमध्ये महिला वकिलास मारहाण;पतीविरोधात गुन्हा दाखल



बीड/प्रतिनिधी

एका महिला वकिलास तिच्या पतीने शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना शिरूर पोलिस ठाण्यात गुरुवारी दुपारी घडली. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात पती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रविकिरण विष्णू सानप असे त्या आरोपीचे नाव आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथील ड. शीतल यांचा विवाह शिरूर कासार तालुक्यातील तागडगाव येथील रविकिरण विष्णू सानप याच्यासोबत २०२१ मध्ये झाला होता. लग्नाच्या एक वर्षानंतर सासू व तीन नणंदा शीतल यांना शारीरिक व मानसिक त्रास देत होते. पती रविकिरण हा दारू पिऊन मारहाण करीत होता. त्यामुळे शीतल यांनी १८ सप्टेंबर २०२४ रोजी गडचिरोली पोलिस अधीक्षकांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदरील अर्जाच्या सुनावणीसाठी शीतल यांची पती रविकिरण व सासरचे कोणीच हजर राहिले नाहीत. गडचिरोली येथील भरोसा सेल यांनी २५ जानेवारी २०२५ रोजी पुढील कारवाई करीता पत्र दिले. त्यामुळे ८ फेब्रुवारी २०२५ आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. आरोपी रविकिरण सानप हा व्यवसायाने वकील असल्याचे समजते.

आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याच्या अनुषंगाने गुन्ह्याचा पंचनामा करण्यासाठी तपासी अंमलदार पोलिस निरीक्षक कैलास गवते यांनी शीतल सानप यांना शिरूर येथील सासरच्या राहत्या घरी शेळके बिल्डिंग हॉल येथे बोलावले होते. त्यानुसार त्या तिथे गेल्या असता रविकिरण सानप हा पोलिसांसमोरच शीतल यांच्या अंगावर धावून गेला, हिचे हात–पाय तोडणार, हिचे खानदान संपवणार आहे, अशी धमकी दिली. आष्टी येथे मीच खोटा गुन्हा दाखल केला आहे, त्यात तुझा बाप व भाऊ कसा फसवला आहे असे म्हणत अश्लील भाषेत शिव्या दिल्या. त्यावेळी आरमोरी ठाण्याचे पोलिस निरीक्षक कैलास गवते, रणजित पिल्लेवान, कुंदा व प्रधान हंसराज धस हे पंच उपस्थित होते.पोनि गवते यांनी शीतल यांना शांत बसण्यास सांगितले. पंचनामा झाल्यानंतर उपस्थित पोलिस, दशरथ वनवे व फिर्यादी शीतल सानप या शिरूर ठाण्यात गेल्या असता रविकिरण सानप हा तेथे आला. पोलिसांसमोर शिव्या देऊन कोण पंच आले होते, कोण स्टेटमेंट देतो असे म्हणत शीतल यांना हात–तोंडावर चापटांनी मारहाण केली, तसेच शीतल यांचे काका दशरथ वनवे यांना शिवीगाळ करून त्यांच्याही अंगावर धावून गेला. त्यावेळी उपस्थित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्याला पकडले. शिरूर पोलिस ठाण्याचे पोलिस अशोक सोनवणे, बावनकर व इतर पोलिस अधिकाऱ्यांनी रविकिरण यास हाताला धरून बाहेर काढले तरी तुझ्या भावाचे तुकडे करणार असल्याची धमकी दिली. याप्रकरणी रविकिरण विष्णू सानप याच्या विरुद्ध शिरूर कासार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत मारली बाजी ;गौरी कांबळेचे यश



दिंद्रुड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी गौरी नवनाथ कांबळे हिने यश संपादन केले असून ती या शिष्यवृत्तीस पात्र झाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार नवनाथ कांबळे यांची मुलगी गौरी कांबळे हिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे. तिच्या या यशाबद्दल अभिनव पब्लिक स्कूलमधील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

# वाल्मिक कराडला पॅनिक अटॅक

## बीड जिल्हा रुग्णालयात उपचार्थ हलविले

बीड/प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मिक कराडची प्रकृती सध्या बिघडली आहे. शनिवारी दुपारी बोलण्यास व श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने शनिवारी दुपारी बीड जिल्हा कारागृहात वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. या पॅनिट अटॅकमुळे तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी सिटीस्कॅन करण्याचा तसेच रक्त चाचणीचाही सल्ला दिला होता. त्यानुसार रात्री बीडच्या जिल्हा रुग्णालयात वाल्मिक कराडची सिटीस्कॅन तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीचा अहवाल रात्री उशिरा येणार असून यानंतरच पुढील उपचाराची दिशा ठरणार असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

वृत्तानुसार, आरोपी वाल्मिक कराडची आज अचानक प्रकृती बिघडली. दुपारच्या सुमारास त्याला अचानक पॅनिट अटॅक आला. जेल प्रशासनाने तातडीने डॉक्टरांना बोलावून घेतले. तपासणीदरम्यान डॉक्टरांनी त्याच्या रक्त चाचण्या करण्याचा सल्ला दिला. वाल्मिक कराडच्या रक्त चाचणीचा अहवाल आणि सिटीस्कॅनचा अहवाल आल्यानंतर त्याच्यावर पुढील उपचार केला जाणार असल्याची माहिती आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्य सुत्रधार म्हणून कोर्टाकडून वाल्मिक कराडची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे. संतोष देशमुखांच्या हत्येचा कट वाल्मिक कराडनेच रचला होता. याचे सबळ पुरावे तपास यंत्रणांकडून कोर्टात सादर करण्यात आले आहेत. एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन समितीकडून या प्रकरणाची त्रिकोणी चौकशी सुरु आहे. त्यानुसार कराड आणि त्याच्या टोळीतील अन्य सहा आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर कोर्टाने त्यांची कोठडीत रवानगी केली आहे. तर या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे सध्या फरार आहे. त्याचा तपास अद्याप पोलिसांकडून सुरु आहे.

# कन्हेरवाडी प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग

## दिलासा:राजेभाऊ फडांच्या भगीरथ प्रयत्नांना यश!

परळी/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या भगीरथ प्रयत्नांना अखेर यश आले असून, आज शनिवार, दिनांक २६ एप्रिल रोजी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राजेभाऊ फड म्हणाले की, जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर आहोत. माझ्यावर प्रेम करणाऱ्या मायबाप जनतेच्या सदैव सेवेत राहण्यात मला समाधान असून, यापुढेही लोकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत. यावेळी कन्हेरवाडी येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचाही आढावा त्यांनी घेतला.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे यासाठी शासन आणि प्रशासनाकडे मागील महिनाभरापासून पाठपुरावा केला. पाणी न सोडल्यास वेळप्रसंगी रस्त्यावरचा संघर्ष करू असा इशारा दिला होता. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय मुख्याभियंत यांच्या तांत्रिक मान्यतेनंतर आज अखेर या जलाशयातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे आता कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते व्हॉलचे चाक फिरवून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मिनिनाथ दादा फड, ज्येष्ठ नेते एच.यू. फड, रामहरी भाऊ फड, संजय मुंडे, प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, प्रकाशदादा फड, बाबासाहेब मुंडे, महादेव मामा मुंडे, श्रीकृष्ण फड, बाबासाहेब फड, मधुकर मुंडे टेलर, वसंत तात्या मुंडे, हरिदास गित्ते, समाधान मुंडे, महेश मुंडे, प्रदीप मुंडे, ऋषिकेश फड यांच्यासह पाटबंधारे विभागाचे चित्ताडे, विडेकर यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थितीत होती.

### कन्हेरवाडी पाणीपुरवठा योजनेचाही घेतला आढावा

कन्हेरवाडी गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना उभारण्यात आली असून, याचे काम पूर्णत्वास आले आहे. यावेळी या योजनेच्या कामाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

# केज पंचायत समितीत गोंधळ!

## प्रश्न: दराडे इंजिनिअर बीडीओ का?




केज/प्रतिनिधी

पंचायत समितीच्या सगळ्या कारभारात लुडबुड करून दराडे इंजिनिअर केज पंचायत समीतीने कामे पाहत आहे परंतु बिडीओ दिवाने मॅडम तुम्ही काय फक्त नावालाच बीडीओ आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण दराडे इंजिनिअर पंचायत समिती जनु काय त्यांची जहागीर आहे असे वागतात त्यामुळे बीडीओ दीवाने मॅडम तुम्ही गटविकासअधिकारी पद दराडेला देऊन बीडीओ दीवाने मॅडम तुम्ही गटविकासअधिकारी पदाचा राजीनामा सीईओ कडे दिला तरी काही हरकत नाही कारण दराडे इंजिनिअर पंचायत समितीचा बीडीओ आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे व तसेच छोट्या मोठ्या कामात चिरीमिरी घेऊन कामे करणाऱ्या दराडेला लाचलुचपत करुन पगार कमी पडत आहे म्हणून बीडीओ पद लाचलुचपत दराडेला देऊन टाकावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# शाश्वत जल स्त्रोत विकास उपक्रमांनी तिगाव जलयुक्त शिवार होणार

वडवणी/प्रतिनिधी

प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व गाव जलसमितीच्या लोकसहभागातून,विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी मार्फत राबवण्यात येणाऱ्या नदी खोलीकरण,रुंदीकरण,माती बंधारे,सिमेंट बंधारे खोलीकरणाचा उदघाटन समारंभ गावचे सरपंच, ऊपसरपंच, ग्रा प सदस्य सर्व गावकरी व शेतकर्यांच्या उपस्थीतीत पार पडला.पहिल्याच बैठकीत लोकसहभागातुन दोन लक्ष तिस हजार निधी जाहीर झाल्याने तिगाव शिवाराची पाणी पातळी वाढून जलयुक्त शिवार होणार आहे.

गावचे सुपुत्र लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांच्या संकल्पनेतुन तिगावची जलयुक्त शिवाराची वाटचाल चालु आहे. त्यासाठी श्री प्रकाश चोले सर प्रकल्प संचालक यांच्या विशेष प्रयत्नाने , प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व विवेकानंद युथ वेल्फ `अर सोसायटी मार्फत प्रकल्प राबवण्यात येणार आहे. (प्राज फाउंडेशन मदत ७० टक्के आणि स्थानिक लोकसहभाग ३० टक्के) सहभाग राहिल.यामधुन नदी खोलीकरण करणे,रुंदीकरण करणे,सिमेंट बंधारे खोली करण करणे,डोह पद्धतीने पावसाचे पडणारे पाणी व वाहून जाणारे पाणी आडविने व जमिनी मध्ये जिरवणे आदी होणाऱ्या कामामुळे जमीनीत पाण्याचे भूजल पुनर्भरण होऊन जमीनीची पाणी पातळी वाढणार आहे. त्यामुळे गाव शिवारातील, पंचक्रोशितील शेतकऱ्यांच्या शेतातील मुख्य जलस्त्रोत असलेल्या विहीर,बोअरवेल अदींना पाणी वाढणार आहे. शेतकर्यांचे उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. तिगाव ची कोरड्या दुष्काळा पासुन नक्कीच सुटका होऊ शकते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात टँकरचा वापर केला जातो. तो या कामामुळे नक्कीच दुष्काळ निवारणासाठी फायदा होऊन टँकर मुक्त होऊ शकते. या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांचे कार्यकारी अधिकारी श्री कैलास अंडील,यांच्या मातोश्री विमल परमेश्वर अंडील, अँड राज पाटील अध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशन,सप्तशृंगी पतसंस्थेचे चेअरमन,डॉ प्रवीण सावंत,विवेकानंद युथ वेल्फ `अर सोसायटी चे प्रकल्प संचालक श्री प्रकाश चोले सर, समन्वयक ढाकणे सर,ग्राम विकास अधिकारी प्रमोद धुमाळ,सुरेश बादाडे,कुप्प्याचे सरपंच श्री सोनवणे,चिंचाळा सरपंच श्रीआजबे, संदीपान अप्पा खळगे, पत्रकार अशोक निपटे,मसुराम शेळके, यांच्या सह गावातील नागरिक, शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### पहील्या टप्प्यातील प्रस्तावित कामे

मुख्य नदीचे खोलीकरण एकूण ४८० मी लांबी (१२० मी लांबीचे ४ डोह) खोलीकरण. दोन माती बंधारे खोलीकरण,मजबुतीकरण करणे.दोन सिमेंट बंधारे १२० मी लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण करणे. हि कामे पूर्ण झाल्यास तिन कोटी लिटर पाणी साठा निर्माण होणार आहे. तर नऊ कोटी लिटर पाण्याचे भूजल पुनर्भरण होणार आहे.

अँड राज पाटील लढा दुष्काळ फाउंडेशन अध्यक्ष बीड)

### एका तासात दोन लक्ष तिस हजार निधी जमा

गाव जलयुक्त शिवार करण्यासाठी गावच्या मंदीरात पहीली बैठक झाली.त्यात लढा दुष्काळ फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांनी एक लक्ष रुपये निधी दिल्यानंतर गावातील सर्व नागरीकांनी लोक सहभागातुन दोन लक्ष तिस हजार एका तासात जाहीर झाला. व कामाला प्रारंभ करण्यात आला. अँड राज पाटील १,००,०००,गणेश शेंडगे १०,०००,सुरेश बादाडे २१००, बालासाहेब शेंडगे ११०००, शेख करीम शमशोदीन ५०००, शेख शब्बीर ११०००, शेख गफार ५०००, सुशील देशमुख ५०००, केशव शेंडगे ११०००, हनुमंत शेंडगे ५०००, सचिन शेंडगे/ इंद्रजीत शेंडगे ११०००, वसुदेव मुंडे ५०००, रमेश पटाईत ५०००, सतीश शेंडगे ५०००, अंकुश शेंडगे ५०००, जालिंदर राऊत २०००, प्रमोद धुमाळ ११०००, नागेश किर्जत ५०००,लक्ष्मण होके ५०००, अविनाश कुचेकर ११०००,दशरथ कुचेकर ११०००

## महिला जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र शेख आयेशा यांना प्रदान



छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा महिला जिल्हाध्यक्ष पदी शेख आयेशा यांची निवड करण्यात आली होती. सदरील निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या शुभहस्ते देण्यात आले. यावेळी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष श्री गोविंद वाकडे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागीय बैठक पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात शनिवार दिनांक २६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता संपन्न झाली. या बैठकीला पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या सह प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य यांची विशेष उपस्थिती लाभली.या बैठकीमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे जून महिन्यामध्ये मराठवाडा स्तरीय पहिला विभागीय मेळावा घेण्यात यावा अशी मागणी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केली. त्यास प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांनी मान्यता दिली. यानंतर मराठवाड्यातील सर्वानुमते निवड झालेल्या सर्व जिल्हाध्यक्षांना नियुक्तीचे पत्र प्रदेश अध्यक्ष श्री गोविंद वाकडे सर यांच्या शुभहस्ते देण्यात आले. बीड महिला जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी शेख आयेशा यांना देण्यात आली. यावेळी त्यांनी पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय महिलांचे स्वतंत्र अधिवेशन घ्यावे अशी मागणी व्यक्त करून पत्रकार संघामध्ये महिलांना देखील सन्मानाचे स्थान देण्यात यावे असे मत मांडले. त्यावर प्रदेशाध्यक्षांनी सदरील सूचना अतिशय चांगली आणि योग्य आहे. लवकरच महाराष्ट्रातले पहिले महिलांचे स्वतंत्र अधिवेशन पुणे येथे घेतले जाईल असे जाहीर करून पत्रकार संघामध्ये महिलांचे संघटन वाढवले जाईल असे जाहीर केले.

## भाजप पक्षाशी एकनिष्ठतेचे फळ सुखदेव रेडे यांना मिळाले-केशवराव आंधळे

### ना.पंकजाताईंनी दिलेल्या संधीचे सोनं करणार- सुखदेव रेडे

वडवणी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून कुठल्याही प्रकारची अशा न बाळगता भारतीय जनता पक्षाशी आणि ना.पंकजाताई मुंडे यांच्या घराण्याशी एकनिष्ठ राहून तसेच राजकारणाची सुरुवात ही भाजप या पक्षात झाली.भाजपाचे अहोरात्र काम करत राहिल्याने व सुखदेव रेडे यांना त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष मिळाले.असे मत चौसाळा विधान सभा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांनी व्यक्त केले.

आज दि.२७ एप्रिल रोजी सम ाधान निवासस्थानी नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष सुखदेव रेडे यांचा तालुक्यातील भाजपच्या वतीने ठेवण्यात आलेल्या भव्य सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.यावेळी वडवणी नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे माजी तालुकाध्यक्ष विश्वनाथ झाटे,संजय आंधळे,अंकुश वारे,अनिल चोले,शिवाजी देवकते,महादेव सावंत,रणजीत धस,धनराज मुंडे,भागवत शिंदे,अभिमान कदम,विठ्ठल शिंदे,नारायण सोळंके,दत्ता रेडे,पपेश पवार,अविनाश लवटे,सुशील कदम,धनंजय आंधळे,यासह डोंगरपट्ट्यातील व तालुक्यातील भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की,ना. पंकजाताई मुंडे यांनी सुखदेव रेडे यांना २०१६ साली देवळा पंचायत समितीची उमेदवारी देऊन निवडून आणुन पंचायत समिती सदस्य केले होते.त्याकाळात देखील त्यांनी पं.स.गणातील विविध प्रश्न मार्गी लावुन अनेक वंचितांना न्याय दिला होता. गेल्या लोकसभा निवडणुकीत अनेक कारणांमुळे राजकीय वातावरण दुषीत असतांना देखील भाजपाचे देवळा गावचे बुथ एजंट म्हणून सुखदेव रेडे यांनी मोलाची कामगीरी केली.पंकजाताईशी एकनिष्ठ राहून भारतीय जनता पार्टीचे अगदी चोखपणे काम पार पडले.या सर्व गोष्टीची दखल घेत भाजपचे कार्यकारी अध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण,ना.पंकजाताई मुंडे(पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री) माजी खा.डॉ प्रितमताई मुंडे,जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सुखदेव रेडे यांची वडवणी भाजप तालुका अध्यक्ष म्हणून निवड केली आहे.येणा-या काळात तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत तालुका अध्यक्ष सुखदेव रेडे यांचा पक्षाला निश्चितच फायदा होईल.असेही ते म्हणाले.याप्रसंगी बन्सीभाऊ मुंडे,संजय आंधळे,यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनराज मुंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रणजीत धस यांनी मानले.



राज्याच्या कॅबीनेट मंत्री व आमच्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांनी तालुका अध्यक्ष पदाची संधी मला दिली आहे.ही जबाबदारी जनतेच्या हितासाठी व पक्षाच्या वाढीसाठी तन मनाने स्विकारून पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करणार.

-सुखदेव रेडे

## चव्हाण यांचा आदर्श ग्रामविकास अधिकारी म्हणून सन्मान

चौसाळा/प्रतिनिधी

चौसाळा ग्रामपंचायत मधील ग्रामपंचायत अधिकारी श्री चव्हाण बी ए यांना जिल्हा परिषद बीड यांच्याकडून आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून पुरस्कार देऊन दिनांक २४ ४ २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री आदित्य जीवने साहेब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. साळुंखे साहेब प्रकल्प संचालक अधिकारी श्रीमती पाटील मॅडम वित्त अधिकारी श्री केंद्रे साहेब पाणीपुरवठा स्वच्छता उपमुख्य अधिकारी मोराळे साहेब व इतर जिल्हा परिषद बीड यांच्या सर्व खाते प्रमुख उपस्थितीत आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले चव्हाण बीए गावात सन २०१६ पासून ते आजगायात काम करत आहेत चौसाळाच्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात आर आर पाटील स्मार्ट ग्रामपंचायत म्हणून तालुक्यात प्रथम क्रमांकाने बक्षीस मिळवून दिलेले आहे.



शासनाच्या विविध विकास योजना हे चांगल्या पद्धतीने व वेळेत सर्वसामान्य माणसापर्यंत राबवितात गावात शासनाचे विविध प्रकल्पाचे उपक्रम तसेच वृक्ष लागवड स्वच्छता बचत गटाची स्थापना कर वसुली घरकुल योजना यासारख्या कामात नियमित अग्रसेर असतात चौसाळा या मोठ्या लोकसंख्येच्या तसेच जिल्हा परिषद गावचे गाव म्हणून असून या ग्रामपंचायत कार्यालय नव्हते आमदार फंडातून झालेले लहान खोलीचे ग्रामपंचायत कार्यालय चलायचे परंतु चौसाळा गावात जुनी ग्रामपंचायत ची मोगलकालीन इमारत एक आरोग्य केंद्राची इमारत या ठिकाणी होती आल्यासारखी मोठी इमारत बांधकाम तसेच गावातील व्यापारी वर्गासाठी व्यापारी गाळे दोन मजली एकूण १५ बांधकाम गाळे केल्या व जाहीर लीला आधारे बोले लावून आलेल्या रकमेतून भव्य इमारत सर्व सोयीने युक्त उभारली आज तेथे कार्यालय चालू आहेत तेथे ग्रामपंचायत तसेच ग्रामपंचायत कामे कर व पाणीपट्टी वसुली करण्यासाठी माननीय जिल्हा न्यायालयाकडून दर तीन महिन्यांनी लोक आदलत होत असते यामध्ये सुद्धा सतत व नियमित चांगले कामे केल्यामुळे माननीय जिल्हा विधि प्राधिकरणचे सचिव साहेब यांनी सुद्धा चांगले कामाबद्दल प्रशस्तिपत्र पत्र देऊन गौरव करण्यात आला होता सदर या मिळालेला पुरस्कार बद्दल जी प. सदस्य अशोक लोढा चौसाळ्यातील सरपंच बाबु शेठ लोढा उपसरपंच अंकुश कळासे सामाजिक कार्यकर्ते नितीन शेठ लोढा सतीश जोगदंड मोहन झोडगे चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे व ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक पत्रकार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे



## भावाच्या शब्दांनी मिळाली उभारी आणि बहिण झाली एमपीएससी अधिकारी!

पाटोदा /प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी सारख्या छोट्याशा गावातील कोमल आप्पाराव भोंडवेची गोष्ट कोणालाही प्रेरणा देऊ शकते! अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला! ह्या तिच्या भावाच्या शब्दांनी तिला एक नवा दृष्टिकोन दिला, आणि त्या शब्दांमुळेच तिनं एमपीएससीच्या कठीण परीक्षेत यश संपादन केलं.गावातील एका साध्या कुटुंबात वाढलेली कोमल, घराच्या सर्व जबाबदाऱ्या पार करत, एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत होती - अधिकारी बनायचं! आणि तिच्या मनात ठरलेलं तिने साध्यही केलं.

तिच्या भावाने नेहमी तिला सांगितलं, मुलीचं कर्तृत्व तिच्या अंगाला लावलेल्या हळदीपेक्षा मोठं असायला हवं. आयुष्याला जिंकायचं असेल, तर कर्तृत्वाची फुलं उगवली पाहिजेत! त्याच्या शब्दांनीच तिला पुढे जाऊन संघर्ष करण्याची आणि योग्य पद्धतीने जीवनाला आकार देण्याची प्रेरणा मिळाली.

कोमलचं यश फक्त तिच्या कुटुंबाचं नाही, तर संपूर्ण गावाचं आहे.

तिच्या यशाचा उत्सव गावात मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. जीप मिरवणूक, टाळ्यांचा गजर, आणि गावकऱ्यांचा अभिमान - या सगळ्याचं एकच कारण होतं, कोमलचं अथक परिश्रम आणि त्यावर मिळालेलं यश.कोमल म्हणते, स्वप्नं पाहणं, त्यांचं ध्येय ठरवणं आणि त्यासाठी मेहनत करणं, हेच यशाचं गमक आहे. आणि भावाच्या शब्दांनी मला नेहमीच हे शिकवलं की, 'यश मिळवण्यासाठी मेहनत हीच खरी हळद आहे आणि कर्तृत्वाचा गुलाल चांगला!'कोमलच्या यशाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे - संघर्ष, धैर्य आणि कष्ट हेच यशाचे खरे शस्त्र आहेत.आज कोमलच्या यशाने साऱ्यांना हे सांगितलं की, संघर्षाचा मार्ग लांब असला तरी, कर्तृत्वाच्या मदतीने प्रत्येक युवक, प्रत्येक मुलगी, स्वप्नं पूर्ण करू शकते!

# मंजरथ रोड रुंदीकरणात नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना संरक्षण?

माजलगाव/प्रतिनिधी

काशी नंतर माजलगाव तालुक्यातील मंजरथ ला दक्षीण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथ ला तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आल्याने तेथे जाण्यासाठी नवीन रस्त्याच्या रुंदीकरणासाठी माजलगाव न.प.च्या हद्दीत असलेल्या पंचशील नगर ,इंदीरा नगर भागातील नागरिकांनी केलेली अतिक्रमणे हटवण्याचे काम न.प.प्रशासना कडुन करत असताना सामान्य नागरिकांची अतिक्रमणे पाडली जाताहेत पण न.प.चे कर्मचाऱ्यां अतिक्रमणांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करीत समानतेने त्यांचीही अतिक्रमणे पाडण्याच्या मागणीचे निवेदन सुहास टाकणखार, राजेंद्र जावळे, धनंजय जावळे यांनी मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री यांच्या सह जिल्हाधिकारी बीड यांनी दिले होते.

यात कागदी घोडे नाचवण्या पलीकडे काहिच ठोस निर्णय न.प.च्या मुख्याधिकाऱ्यां कडुन घेण्यात न आल्याने संताप व्यक्त करत संबंधित निवेदन कर्त्यांनी २५एप्रिल रोजी काम बंद केले. या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,सदरील रोडचे विस्तारीकरण होत नसल्याचे २४/०१/२०२५रोजी दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आल्या नंतर मुख्याधिकारी यांनी सांगितले होते की, संबंधीत इंजीनिअर सोबत चर्चा करुन तांत्रीक दुरुस्ती करुन त्या नुसार रुंदी करणात येणारी अतिक्रमणे पाडली जातील असे आश्वासन दिले त्या नुसार इंजीनिअर यांनी सुद्धा तेच आश्वासन दिले होते.



त्यात त्यांनी सांगितले होते कि, सदरील भागातील अण्णाभाऊ साठे चौका पासुन पुढे दक्षीण, उत्तर दिशे वरील दोन हि बाजुला असलेल्या प्लॉटिंगची मोजणी करुन ६०फुटांच्या रस्त्याचे सेंटर काढून त्या प्रमाणे अतिक्रमणे पाडली जातील. पण मोजणी करणारेच न.प.चे कर्मचारी आहेत ज्यांची अतिक्रमणे सेंटर च्या सिमा रेषेत येतात म्हणुन त्यांनी त्यांच्या अनाधिकृत जागा सोडुन उत्तर दिशेने जास्तीचे मार्क आऊट टाकले आहे तरीही काहीच हरकत नाही असे निवेदन कर्त्यांनी म्हटले असुन दक्षिणे कडे हि तोच निकष नप.कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना बाबत लावण्यात यावा अशी मागणी केली आहे.

## गायींना गुंगीचे औषध देणाऱ्यांना तात्काळ अटक करा !

### परळीतील 'त्या' संतापजनक प्रकाराची ना. पंकजा मुंडेंनी घेतली दखल

परळी /प्रतिनिधी

गायींना गुंगीचे औषध देऊन त्यांची तस्करी करण्याचा प्रयत्न काही नागरिकांच्या सतर्कतेमुळे फसल्याचा प्रकार शहरात घडल्यानंतर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तात्काळ अटक करावी अशा सूचना त्यांनी पोलिस प्रशासनाला दिल्या आहेत.

शहरातील स्नेहनगर भागात काल रात्री गायींना खाण्याच्या पदार्थांमधून औषध देण्याचा संतापजनक प्रकार घडला. गायींना बेशुद्ध करून त्यांची तस्करी करण्याचा अज्ञात चोरट्यांचा प्रयत्न होता असा संशय स्थानिक रहिवाशांना आला, त्यांनी सतर्कता दाखवून हा प्रयत्न हाणून पाडला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना हा प्रकार समजताच त्यांनी तातडीने पोलिस अधीक्षक व स्थानिक पोलिस निरीक्षक यांना संपर्क साधून या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

गुंगीचे औषध मिश्रित पदार्थ खाल्याने ज्या गायी बाधित झाल्या होत्या त्यावर त्वरेने उपचार करण्यास त्यांनी सांगितल्यानंतर पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उपचार करून चार गायींना धोक्यात बाहेर काढले, एका गायीवर उपचार सुरू आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ माळीवेस ,बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड - ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. उपसंपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२
This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID– skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Deputy Editor Appasaheb Mahanor, Mo-9511712592